13 JUN 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# एम.फिल, पीएच.डी. प्रवेशासाठी ५० गुणांची अट

## परीक्षार्थींची कसोटी : रिसर्च मेथडॉलॉजीवर २५ प्रश्न

स सकाळ विशेष

संदीप खांडेकर : सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १२ : यंदापासून शिवाजी विद्यापीठात एम.फिल, पीएच.डी.ला प्रवेशासाठी १०० पैकी ५० गुण मिळाल्यानंतरच परीक्षार्थी पात्र ठरणार आहे. परीक्षेत प्रत्येक प्रश्नाला दोन गुण दिले जाणार असून 'रिसर्च मेथडॉलॉजी'वर २५ व उर्वरित २५ प्रश्न संबंधित विषयावर विचारले जाणार आहेत. विशेष म्हणजे पीएच.डी.साठी पदार्थविज्ञान विभागात सर्वाधिक ५१, एम.फिल.साठी



पदार्थविज्ञान, मराठी व इंग्रजी विषयासाठी सर्वाधिक प्रत्येकी २० जागा उपलब्ध आहेत. पीएच.डी.साठी एकूण ६९६, तर एम. फिल.साठी २११ जागा परीक्षार्थींसाठी उपलब्ध आहेत.

एम.फिल, पीएच.डी.साठी एम.ए.ची टक्केवारी, मुलाखतीस दिलेले गुण व प्रवेश परीक्षेतील गुण एकत्रित करून मेरीट लिस्ट जाहीर केली जात होती. यंदा विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नव्या नियमानुसार प्रवेश परीक्षा होत असल्याने प्रवेश परीक्षेचे स्वरूप बदलले असून, परीक्षार्थींना रिसर्च मेथडॉलॉजी विषयाचा कसून अभ्यास करावा लागणार आहे. रिसर्चचा आवाका लक्षात यावा, रिसर्च म्हणजे काय व त्याची गुणवत्ता वाढावी, या उद्देशाने हा विषय प्रवेश परीक्षेत समाविष्ट केला आहे. परीक्षार्थींना या विषयासह संबंधित विषयावरही लक्ष केंद्रीत करावे लागेल. प्रवेश परीक्षा झाल्यानंतर मेरीट लिस्ट जाहीर करण्यात येईल. त्यानंतर परीक्षार्थींची मुलाखत घेऊन विषय निश्चिती केली जाणार आहे. मुलाखतीत परीक्षार्थीला शोधप्रबंधासाठीच्या विषयाचे सादरीकरण करावे लागणार आहे. स्वरूप बदलले आहे.

विद्यापीठाने प्रवेश परीक्षेपूर्वी कॅटगरीनुसार कोणत्या विषयासाठी किती जागा उपलब्ध आहेत, याची माहिती दिली आहे. यापूर्वी सर्व अधिविभागांना कॅटगरीनुसारची यादी करावी लागत होती. परीक्षार्थी विभागात जाऊन ती माहिती घेत होते. विद्यापीठाने ही माहिती वेबसाईटवरच उपब्ध केली आहे. मास कम्युनिकेशन व वृत्तपत्र विद्या विभागात एकही जागा रिक्त नसल्याने या विभागाकरीता यंदा प्रवेश परीक्षा होणार नसल्याचे सांगण्यात आले.

### सर्वाधिक उपलब्ध जागा अशा

**पीएच.डी.**

- पदार्थविज्ञान ........ ५१
- रसायनशास्त्र ........ ४५
- इतिहास ........ ४०
- मराठी ........ ३९
- मेकॅनिकल इंजिनिअरिंग ........ ३३
- इंग्रजी ........ ३१
- हिंदी ........ ३०
- समाजशास्त्र ........ २८
- कॉमर्स व शिक्षणशास्त्र .... प्रत्येकी २७

**एम. फिल.**

- पदार्थविज्ञान ........ २०
- मराठी ........ २०
- इंग्रजी ........ २०
- हिंदी ........ १६
- वनस्पतीशास्त्र ........ १६
- अर्थशास्त्र ........ १६
- रसायनशास्त्र ........ १५
- इतिहास ........ १२
- शिक्षणशास्त्र ........ १०

### आवश्यक कागदपत्रे

- पॅन कार्ड
- आधार कार्ड
- ड्रायव्हिंग लायन्स
- महाविद्यालयीन/विद्यापीठाचे ओळखपत्र

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 JUN 2017
Times of India

# MPhil, PhD entrance exams from June 21

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University has issued information about upcoming MPhil and PhD exams on the university website.

An official from the Shivaji University, Kolhapur (SUK), said the exam will start on June 21 for as many as 43 subjects and will end on June 23.

A circular issued by Mahesh Kakade, director of the board of examinations and evaluation, said that the subject-wise schedule for MPhil and PhD entrance test has been published on the university website — www.unishivaji.ac.in under the link MPhil/PhD admissions 2017.

The circular stated that the exam will be held in three districts — Kolhapur, Sangli and Satara from June 21-23. The humanities building in the SUK premises, Smt Kasturibai Walchand College of Arts and Science, in Sangli and Yashwantrao Chavan Institute of Science in Satara will host the exam.

It said that the exam will be held in three sessions each day on the said dates. First session will be from 10am to 12pm, second session will be from 1pm to 3pm and the last session will be from 4pm to 6pm to accommodate all aspirants.

It added that candidates should use only black ball point pens to fill up the particulars on the OMR sheet. Use of pencils and gel pens is strictly prohibited during the exam. Candidates are not allowed to carry or possess any objectionable material otherwise they will be denied from entering the exam hall and candidates should report at the centre at least 30 minutes before the exam starts.

The official said that there are over 500 seats offering for the 47 subjects for the PhD candidates, while for MPhil there are over 100 seats for 22 subjects. The official said that the procedure for admission will be undertaken as per the University Grants Commission Regulations 2016.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 JUN 2017
सकाळ

# एम. फिल, पीएच. डी. परीक्षा कार्यक्रम जाहीर

कोल्हापूर, ता. १२ : शिवाजी विद्यापीठातर्फे एम. फिल, पीएच.डी. प्रवेश परीक्षेचा कार्यक्रम जाहीर झाला असून, २१ ते २३ जून दरम्यान परीक्षा होईल. विद्यापीठातील मानव्यशास्त्र इमारत, सांगलीतील कस्तुरबाई वालचंद कॉलेज ऑफ आर्टस् अँड सायन्स, तर सातारातील यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समध्ये बैठक व्यवस्था केली आहे. ऑफलाईन प्रक्रियेद्वारे परीक्षा होईल.

तारीख, विषय, वेळ अशी : २१ जून - बिझनेस मॅनेजमेंट, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग, मराठी, इन्स्ट्रुमेंटेशन इंजिनिअरिंग, स्टॅटिस्टिक्स, अर्धमागधी (सकाळी १० ते १२), समाजशास्त्र, बिझनेस इकॉनॉमी/अकाऊंटन्सी/ कॉमर्स, पदार्थविज्ञान, फूड टेक्नॉलॉजी इंजिनिअरिंग, होम सायन्स, बायो-टेक्नॉलॉजी इंजिनिअरिंग (दुपारी १ ते ३), हिंदी, टेक्स्टाईल इंजिनिअरिंग, संस्कृत, वनस्पतीशास्त्र, राज्यशास्त्र, फूड सायन्स अँड टेक्नॉलॉजी (दुपारी ४ ते सायंकाळी ६).

२२ जून - सिव्हिल इंजिनिअरिंग, केमिस्ट्री, इतिहास (सकाळी १० ते १२), इलेक्ट्रॉनिक्स अँड टेले कम्युनिकेशन, एन्व्हार्मेंटल सायन्स, कंम्प्युटर सायन्स, मॅथेमॅटिक्स, फिजिकल एज्युकेशन (दुपारी १ ते ३), इलेक्ट्रॉनिक्स, मेकॅनिकल इंजिनियरींग, मानसशास्त्र, अर्थशास्त्र (दुपारी ४ ते ६). २३ जून : एज्युकेशन, कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनियरींग, लायब्ररी सायन्स अँड इन्फर्मेशन, फार्मसी (सकाळी १० ते १२), भूगोल, मायक्रोबॉयोलॉजी, इंग्रजी, केमिकल इंजिनियरींग (दुपारी १ ते ३), बायो केमिस्ट्री/बायो टेक्नॉलॉजी, अॅग्रो केमिकल अँड पेस्ट मॅनिजमेंट, लॉ, प्राणीशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग (दुपारी ४ ते ६).

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 JUN 2017
महाराष्ट्र टाईम्स

# हलकर्णी महाविद्यालयाचा होणार गौरव

**चंदगड :** हलकर्णी (ता. चंदगड) येथील दौलत विश्वस्त संस्थेच्या यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचा विशेष सन्मान शिवाजी विद्यापीठाकडून होणार आहे. दरवर्षी प्रमाणे यंदादेखील ग्रामीण गटातून महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी गुणवत्ता शिष्यवृत्ती प्राप्त केली आहे. ग्रामीण विभागात सर्वाधिक शिष्यवृत्ती प्राप्त करुन महाविद्यालयाने यशाची परंपरा राखली आहे.. शिवाजी विद्यापीठाकडून नुकतेच तसे पत्र प्राप्त झाले आहे.